




परळी

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 150 | मंगळवार दि. 23 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060







# महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत महायुतीची मुसंडी; मविआची मतफुटी




मुंबई, दि. 22 जून : महाराष्ट्र विधान परिषदेच्या 17 जागांच्या निवडणुकीत महायुतीने दणदणीत यश मिळवत 16 जागांवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. मात्र, नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी विजय मिळवत महायुतीला मोठा धक्का दिला. या निकालानंतर विविध मतदारसंघांतील क्रॉस व्होटिंग आणि मतफुटीची जोरदार चर्चा गली आहे.

राजकीय विश्लेषणानुसार, अनेक ठिकाणी पक्षांच्या अपेक्षित संख्येपेक्षा वेगळे मतदान झाल्याने अंतर्गत नाराजी आणि मतफुटीचे चित्र स्पष्ट झाले आहे. नागपूरमध्ये महाविकास आघाडीची सुमारे 39 मते फुटल्याची चर्चा असून, अमरावतीमध्ये तब्बल 94 मतांची फूट झाल्याचे बोलले जात आहे. जळगावमध्ये मविआची 90 मते फुटल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे, तर धाराशिव-लातूर मतदारसंघात 146 मतांची फूट झाल्याची चर्चा आहे.

दुसरीकडे, सांगली-सातारा मतदारसंघात महायुतीची सुमारे 100 मते फुटल्याचा दावा महाविकास आघाडीने केला आहे. भंडारा-गोंदिया मतदारसंघातही महायुतीची 35 मते फुटल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

सर्वाधिक चर्चेचा विषय ठरलेल्या नाशिकमध्ये अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांना 357 मते मिळाली, तर महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांना 248 मते पान 3 वर

## धाराशिव: भाजपचे बसवराज पाटील रेकॉर्डब्रेक 844 मतांसह विजयी

### कॉंग्रेसची मते फुटल्याचे उघड



/धाराशिव: मराठवाड्याच्या राजकीय पटलावर अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधानपरिषद निवडणूक 2026 चा अंतिम निकाल आज अपेक्षेनुरूप महायुतीच्या बाजूने लागला आहे. या अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक ठरलेल्या लढतीत भाजपचे दिग्गज नेते आणि अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांनी विरोधकांना चारीमुंड्या चित करत तब्बल 719 मतांचे विक्रमी मताधिक्य मिळवून दणदणीत विजय साकारला आहे. त्यांनी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार महेश देशमुख यांचा अत्यंत दारुण पराभव केला असून, निकाल जाहीर होताच धाराशिव शहरातून भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी विजयी उमेदवाराची ढोल-ताशांच्या गजरात भव्य विजयी मिरवणूक काढली आहे.

आज सोमवार, 22 जून 2026 रोजी पार पडलेल्या अधिकृत मतमोजणीच्या अंती समोर आलेली पान 3 वर

## आज ठळक

### केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचेकडे सांत्वनपर भेट



केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे वडील कै. किसनराव मोहोळ यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. आज पुणे येथे ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन मोहोळ परिवाराची सांत्वनपर भेट घेतली आणि कै. किसनराव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी मा.खा.डॉ.प्रितमताई मुंडे उपस्थित होत्या.

### 48 तास अत्यंत महत्त्वाचे; या जिल्ह्यांना पाऊस झोडपणार

#### हवामान विभागाकडून मोठा इशारा



जुनच्या पहिल्याच आठवड्यात राज्यात मान्सूनचं आगमन झालं होतं. त्यावेळी राज्याच्या काही भागांमध्ये पावसाने हजेरी लावली होती, मात्र त्यानंतर पावसाला मोठा ब्रेक लागल्याचं पहायला मिळालं, जुन महिना संपत आला तरी देखील महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडला नव्हता. मात्र आता पुन्हा एकदा राज्यात मान्सून सक्रिय झाला आहे. सोमवारी महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर आता पान 3 वर

### 23 जूनला एकल महिला दिवस साजरा करावा

बीड, दि.22(जिमाका):- आंतरराष्ट्रीय विधवा दिन दि. 23 जून रोजी साजरा केला जातो. आणि महाराष्ट्रात आता हा दिवस एकल महिला दिवस म्हणून शासकीय पातळीवर साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय विधवा दिनाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यात विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार हा दिवस एकल महिला दिवस म्हणून साजरा करण्यात यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या आहेत.

कार्यक्रमात महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध शासकीय अर्थसाहाय्य योजना, स्वयंरोजगार, बँक कर्ज आणि कायदेशीर हक्कांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मुलांचे संगोपन करणाऱ्या आणि समाजात स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान एकल महिलांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात यावा. समाजात सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून देणे आणि एकल महिलांचे सक्षमीकरण करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असेही कळविण्यात आले आहे.

## सहा खासदारांचा शिवसेनेत प्रवेश; शिवसेना अधिक बळकट होणार – एकनाथ शिंदे




मुंबई, दि. 22 : खासदार संजय जाधव, नागेश पाटील आष्टीकर, संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांनी आज मुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली पान 3 वर

## विधानपरिषद निवडणूकीत महायुतीची सरशी ; ना. पंकजाताई मुंडे यांनी केले नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन

### ➡ बीड मधून विजयी झालेल्या बस्वराज पाटील यांना दिल्या शुभेच्छा



मुंबई दि. 22 --- स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत भाजपा महायुतीची सरशी झाली असून 17 पैकी 16 जागांवर महायुतीने घवघवीत यश संपादन केले आहे. आजच्या मतमोजणीनंतर विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित आमदारांचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

विधानपरिषदेच्या निवडणूकीच्या अकरा जागांची मतमोजणी आज झाली, यात दहा जागांवर भाजपा महायुतीचे आमदार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, एकूण 17 जागांपैकी यापूर्वी महायुतीच्या 6 जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या, त्यामुळे आजच्या मतमोजणीनंतर महायुतीचे 16 आमदार विजयी झाले असून विरोधी आघाडीला एकही जागा मिळाली नाही.

बीड-धाराशिव-लातूर मतदारसंघातून निवडून आलेले पान 3 वर

## पवार कुटुंबियांच्या आनंदात मुंडे परिवार सहभागी

### • बाळदादा पवार यांच्या चिरंजीवाच्या विवाहास ना. पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे यांची उपस्थिती



बीड दि. 22 --- जिल्ह्यातील गेवराईच्या बाळदादा पवार यांच्या कुटुंबियांच्या आनंदात मुंडे परिवार सहभागी झाल्याचा सुखद क्षण आज दिसून आला. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी पवार यांच्या चिरंजीवांच्या विवाहास उपस्थित राहून नव दाम्पत्यास शुभाशीर्वाद दिले.

गेवराई येथील भाजपा नेते श्री बाळदादा पवार आणि नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांचे सुपुत्र चि. शिवराज आणि श्री. सुरेशराव पंडितराव यादव रा. रामपुरी, जि. पान 3 वर

## महेश नवमी निमित्त आयोजित आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद





### 61 जणांची आरोग्य तपासणी; 80 रक्तदात्यांनी केले रक्तदान

परळी वैजनाथ | प्रतिनिधी महेश नवमी 2026 निमित्त स्व. कौसल्याबाई गोविंदलालजी नावंदर यांच्या स्मरणार्थ परळी माहेश्वरी महिला संघटना आणि परळी तालुका माहेश्वरी युवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात 61 जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली तर 80 पान 3 वर

## "ग्लोबल गाव" घडविण्याचा दृढ संकल्प; पहिल्याच बैठकीत 20 गावांचा उत्स्फूर्त सहभाग

### • जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत GVT कृषीकुल येथे भव्य संवाद मेळावा; 25 लक्ष वृक्ष लागवड महाअभियानालाही वेग



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) ग्रामीण विकासाला नवी दिशा देणाऱ्या "ग्लोबल गाव स्पर्धा" आणि "25 लक्ष वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियान" या महत्त्वाकांक्षी उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी GVT कृषीकुल येथे परळी, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव आणि सोनपेठ तालुक्यातील गावांचे सरपंच तसेच महिला आर्थिक यांनी विकास महामंडळाच्या बचत गट अध्यक्षा यांचा भव्य संवाद कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला जलनायक मयंक गांधी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मार्गदर्शन करताना मयंक गांधी पान 3 वर

## विलास घुले मृत्यू प्रकरणी कायदेशीर कारवाई करावी - खा.बजरंग सोनवणे



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे केज तालुक्यातील टाकळी परिसरात तरुणांच्या आपसांतील भांडणातून विलास घुले या तरुणाचा झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक आहे. एका निष्पाप तरुणाला अशा प्रकारे जीव गमवावा लागणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विलास घुले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि घुले परिवाराला या अथांग दुःखातून सावरण्याचे बळ देवो, हीच प्रार्थना.बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे हे पोलिसांचे पान 3 वर

## हलगीच्या तालातून थेट देशसेवेपर्यंत! हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या तरुणाची अग्निवीर जवानपदी निवड

## परळीच्या साठेनगरमध्ये जल्लोष



परळी प्रतिनिधी : परळीच्या साठे नगर मधील ज्या घरात दोन वेळच्या जेवणाची चिंता होती, ज्या वडिलांनी हलगी वाजवून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला, त्या कष्टकरी कुटुंबातील संतोष चौरे या तरुणाने आज भारतीय सैन्यात अग्निवीर जवान म्हणून निवड मिळवत संघर्षावर यशाची मोहोर उमटवली आहे. या अभिमानास्पद यशामुळे परळी शहरातील साठेनगर परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून प्रथमच साठे नगर परिसरातून देशसेवेत निवड झाली असल्याने नागरिकांनी जल्लोषात त्याचे स्वागत केले.





आर्थिक संकट, अभाव आणि प्रतिकूल परिस्थिती यांचा सामना करत वाढलेल्या या तरुणाने लहानपणापासूनच देशसेवेचे स्वप्न पाहिले होते. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे अनेक अडचणी त्याच्या वाट्याला आल्या, मात्र त्याने परिस्थितीसमोर कधीही हार पान 3 वर

## जिजामाता फिजिओथेरपी व नर्सिंग कॉलेजमध्ये योग दिन उत्साहात साजरा

### • निरोगी वृद्धत्वासाठी योग थीमवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन




माजलगाव | प्रतिनिधी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी महाविद्यालयाच्या प्रांगणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावर्षीच्या "निरोगी वृद्धत्वासाठी योग" (Yoga for Healthy Ageing) या संकल्पनेवर आधारित शिबिरात शारीरिक गतिशीलता व मानसिक दीर्घायुष्य राखण्यावर विशेष भर देण्यात आला. सकाळी 8.30 वाजता सुरु झालेल्या या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने 7.50 पासूनच उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात योग स्वयंसेवक गीता गायके मॅडम यांचा सत्कार करून करण्यात आली. यावेळी फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पॉलराज जिजामाता नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य प्रवीण कुमार , उपप्राचार्य सिमुलिया डिनजु मॅडम कुलकर्णी सर, इरफान पठाण सर यांनी प्रास्ताविकात योगाचे शास्त्रीय महत्त्व व फिजिओथेरपीशी असलेला संबंध स्पष्ट केला. "योगामुळे सांध्यांची लवचिकता, स्नायूंची ताकद आणि संतुलन टिकून राहते. वृद्धापकाळातील दुखणी टाळण्यासाठी तारुण्यातच योगाची सवय लावणे गरजेचे आहे," असे ते म्हणाले.

तज्ज्ञ मार्गदर्शक गीता ज्ञानेश्वर गायके मॅडम. यांनी सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन तसेच अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम यांचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

. "धकाधकीच्या जीवनात आरोग्य टिकवण्यासाठी योग हाच खरा उपाय आहे. या उपक्रमातून निरोगी जीवनशैलीचा संदेश घराघरात पोहोचेल," असे आवाहन करण्यात आले.

सर्व सहभागी विद्यार्थी व नागरिक सैल क्रीडा पोशाखात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इरफान पठाण सर यांनी केले.

- *विशेष*: 200+ सहभागी, प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन तसेच या कार्यक्रमासाठी जिजामाता फिजिओथेरपीचे सर्व शिक्षक वृंद आणि जिजामाता नर्सिंग कॉलेजचे सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेरोजगारी, एकटेपणा आणि बदलते नातेसंबंध : समाजासमोरील नव्या वास्तवाचे चिंतन



भारतीय समाजाची ओळख ही मजबूत कुटुंबव्यवस्था, परस्पर विश्वास, सामाजिक बांधिलकी आणि मानवी नातेसंबंधांच्या दृढतेमुळे निर्माण झाली आहे. कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नसून भावनिक आधार, आर्थिक सुरक्षितता, सामाजिक संस्कार आणि जीवनातील स्थैर्य देणारी संस्था म्हणून ओळखली जाते. मात्र गेल्या काही दशकांत तंत्रज्ञान, जागतिकीकरण, शहरीकरण, बदलती अर्थव्यवस्था आणि जीवनशैलीतील परिवर्तन यांमुळे समाजाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. या बदलांचा सर्वाधिक प्रभाव तरुण पिढीच्या जीवनावर आणि नातेसंबंधांवर होताना दिसतो.

आज लाखो युवक-युवती उच्च शिक्षण घेत आहेत. पदव्या, पदव्युत्तर शिक्षण, व्यावसायिक पात्रता आणि कौशल्ये मिळवत आहेत. परंतु त्याच वेळी गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या संधी अपेक्षित प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. अनेकांना अस्थिर नोकऱ्या स्वीकाराव्या लागतात, काहींना दीर्घकाळ बेरोजगारीचा सामना करावा लागतो, तर काही जण स्पर्धा परीक्षांच्या तयारीत अनेक वर्षे घालवतात. परिणामी आर्थिक स्वावलंबन उशिरा प्राप्त होते आणि त्याचा परिणाम विवाह, कुटुंब आणि सामाजिक जीवनावर होतो.

भारतीय समाजात विवाह हा केवळ वैयक्तिक निर्णय नसून सामाजिक आणि कौटुंबिक संस्था मानली जाते. रोजगारातील अस्थिरता, वाढती महागाई, निवासव्यवस्थेचा खर्च, करिअरमधील अनिश्चितता आणि वाढत्या अपेक्षा यांमुळे अनेक युवक-युवती विवाहाचा निर्णय पुढे ढकलत आहेत. त्यामुळे विवाहाचे सरासरी वय वाढत आहे. या प्रक्रियेमुळे अनेकांना दीर्घकाळ भावनिक आणि सामाजिक एकटेपणाचा अनुभव येऊ लागतो.

मानवी जीवनात आर्थिक गरजांइतकीच भावनिक गरजही महत्त्वाची असते. प्रत्येक व्यक्तीला संवाद, सहवास, समजून घेणारी व्यक्ती आणि आपलेपणाची भावना आवश्यक असते. पूर्वी संयुक्त कुटुंबव्यवस्था, शेजारपाजार, सामाजिक कार्यक्रम आणि नातेसंबंधांचे जाळे या गरजा मोठ्या प्रमाणात पूर्ण करत असे. आजच्या शहरी आणि डिजिटल जीवनशैलीत या रचना बदलत आहेत. अनेक युवक शिक्षण किंवा रोजगारासाठी घरापासून दूर राहतात. प्रत्यक्ष भेटी कमी होतात आणि डिजिटल संवाद वाढतो. त्यामुळे सोशल मीडिया, ऑनलाइन प्लॅटफॉर्म आणि डेटिंग ॲप्स हे सामाजिक संपर्काचे नवीन माध्यम बनले आहेत.

याच पार्श्वभूमीवर बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंड, डेटिंग, कॅज्युअल डेटिंग, लाँग डिस्टन्स रिलेशनशिप, ऑनलाइन रिलेशनशिप, व्हर्च्युअल रिलेशनशिप, सिच्युएशनशिप, फ्रेंड्स विथ बेनिफिट्स, लिव्ह-इन रिलेशनशिप, प्री-मॅरिटल रिलेशनशिप, पोस्ट-मॅरिटल रिलेशनशिप, एक्स्ट्रा-मॅरिटल रिलेशनशिप, ओपन रिलेशनशिप आणि पॉलीॲमरी यांसारख्या संकल्पना अधिक चर्चेत येत आहेत. या संज्ञांचा वाढता वापर हा समाजातील बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. या सर्व प्रकारांकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. काही संबंध परस्पर विश्वास, प्रेम आणि समजुतीवर आधारित असतात, तर काही संबंध तात्पुरत्या गरजा किंवा परिस्थितीमुळे निर्माण होतात.

समाजासाठी चिंतेचा विषय संबंधांचे अस्तित्व नसून त्यामागील असमतोल आणि शोषणाची शक्यता आहे. जेव्हा एखाद्या संबंधात आर्थिक, सामाजिक किंवा व्यावसायिक शक्तीचे मोठे अंतर असते, तेव्हा दुर्बल बाजूच्या व्यक्तीला फसवणूक, मानसिक तणाव किंवा शोषणाचा धोका निर्माण होऊ शकतो. काही वेळा आर्थिक मदत, करिअरच्या संधी, नोकरीची आशा किंवा भावनिक आधार यांच्या नावाखाली असमान संबंध निर्माण होतात. "शुगर डॅडी", "शुगर मम्मी", "शुगर बेबी" किंवा व्यवहाराधारित संबंधांवरील चर्चा याच पार्श्वभूमीवर होताना दिसते. अशा घटना सर्वसाधारण नाहीत, परंतु त्या समाजातील आर्थिक आणि भावनिक असुरक्षिततेचे संकेत म्हणून पाहता येतात.

डिजिटल युगाने नातेसंबंधांना नवीन संधी दिल्या आहेत, परंतु नवीन समस्या देखील निर्माण केल्या आहेत. "घोस्टिंग" म्हणजे अचानक संपर्क तोडणे, "ब्रेडक्रंबिंग" म्हणजे आशा दाखवत संबंध टिकवून ठेवणे, "कॅटफिशिंग" म्हणजे खोटी ओळख वापरुन फसवणूक करणे अशा संकल्पना आता सामाजिक चर्चेचा भाग बनल्या आहेत. या घटनांमुळे मानसिक आरोग्य, आत्मविश्वास आणि सामाजिक विश्वास यांवर परिणाम होऊ शकतो.

या संपूर्ण प्रक्रियेचे विश्लेषण करताना केवळ नैतिकतेच्या चौकटीत विचार करणे अपुरे ठरते. बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, वाढते शहरीकरण, व्यक्तिकेंद्री जीवनशैली, डिजिटल संस्कृती, बदलती कौटुंबिक रचना आणि मानसिक आरोग्याशी संबंधित प्रश्न यांचा एकत्रित परिणाम म्हणून या बदलांकडे पाहणे आवश्यक आहे. आजची तरुण पिढी अनेक संधींच्या जगात जगत असली तरी ती प्रचंड स्पर्धा, अनिश्चितता आणि मानसिक दडपणालाही सामोरी जात आहे.

जगातील अनेक विकसित देशांमध्ये विवाहाचे प्रमाण कमी झालेले दिसते, जन्मदर घटलेला दिसतो आणि एकटे राहणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढलेली दिसते. त्याच वेळी मानसिक आरोग्याच्या समस्या, सामाजिक एकाकीपणा आणि भावनिक असुरक्षितता यांवरही मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की आर्थिक विकास आणि तांत्रिक प्रगती महत्त्वाची असली तरी मानवी नातेसंबंधांचे महत्त्व कमी होत नाही.

समाजासमोरील खरे आव्हान कोणत्या प्रकारचे संबंध अस्तित्वात आहेत हे नाही; तर त्या संबंधांमध्ये विश्वास, समानता, जबाबदारी आणि मानवी प्रतिष्ठा टिकून आहे का हा आहे. कोणत्याही समाजाची दीर्घकालीन ताकद त्याच्या अर्थव्यवस्थेबरोबरच त्याच्या सामाजिक भांडवलावर अवलंबून असते. परस्पर विश्वास, कुटुंबसंस्था, मैत्री, सामाजिक सहकार्य आणि भावनिक आधार या गोष्टी समाजाला स्थैर्य प्रदान करतात.

यासाठी रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकतेला प्रोत्साहन, मानसिक आरोग्य सेवा, जीवनकौशल्य शिक्षण, आर्थिक साक्षरता आणि कौटुंबिक संवाद यांना अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. युवकांना केवळ नोकरीच नव्हे तर जीवनातील संबंध, जबाबदाऱ्या, भावनिक परिपक्वता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचेही शिक्षण मिळाले पाहिजे. पालक, शिक्षक, समाज आणि शासन यांनी या प्रक्रियेत सकारात्मक भूमिका बजावणे आवश्यक आहे.

आजची धोक्याची घंटा बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड, डेटिंग किंवा सोशल मीडियाची नाही. खरी धोक्याची घंटा आहे वाढती बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, भावनिक एकटेपणा, मानसिक तणाव आणि मानवी नातेसंबंधांमधील विश्वासाचा संभाव्य ऱ्हास. या मूळ प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले, तर बदलत्या काळातही समाज आपली मूल्यव्यवस्था, मानवी संवेदनशीलता आणि सामाजिक स्थैर्य जपत पुढे जाऊ शकतो.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# विधवाविवाहास प्रोत्साहन द्यावे

### (23 -29 जून:आंतरराष्ट्रीय विधवा दिन सप्ताह विशेष.)

आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-19 साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो.

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने 23 जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने 23 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने 23 जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील 115 दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर 81 दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत. या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे- जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही 8 नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते.

जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो. जगभरात 258 दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत. एकटी-माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका.

युनायटेड नेशन्स सन 2011पासून 23 जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे. यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात. शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे. न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे. संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निर्माण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड-19 च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगलेट सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये. आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया.

!! जागतिक विधवा दिनानिमित्त समस्त विधवा भगिनींना आठवडाभर हार्दिक शुभकामना जी !!

**- संकलन व शब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

## सिद्धीविनायक योग शाखेतर्फे योग शिबिर संपन्न



माजलगाव, ( अनंत घडसिंगे ) :


21 जून रविवार रोजी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून सिद्धीविनायक मंदिर सिद्धीविनायक कॉलनी बायपास रोड माजलगाव येथे सिद्धीविनायक योग शाखे'च्या वतीने एका विशेष योग शिबिराचे शानदार आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांनी व योगप्रेमींनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.

शिबिरामध्ये योग शिक्षक बालाजी गरुड यांनी उपस्थितांना आरोग्यदायी गुरुकिल्ली दिली. त्यांनी शरीरातील लवचिकता वाढवणारे सूक्ष्म व्यायाम, विविध योगासने आणि मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असलेले प्राणायामचे प्रात्यक्षिके करून घेतली. "निरोगी व तणावमुक्त आयुष्यासाठी योग ही काळाची गरज आहे," असा मोलाचा संदेश त्यांनी या वेळी दिला.

या शिबिरास सिद्धीविनायक अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील रा. स्व. संघाचे जिल्हा कार्यकारणी सदस्य जगदीश देशमुख ज्येष्ठ स्वयंसेवक पंढरीनाथ जोशी नरेंद्रआप्पा जोशी कमलाकर देशमुख अनिल गोंडे भाजपा माजलगाव उपाध्यक्ष अविनाश कांडुरे यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक व योगा प्रेमी नागरिक उपस्थित होते. शिबिराच्या शेवटी शिबिराचे आयोजक डॉ. प्रशांत पाटील यांनी उपस्थितांचे व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले. सर्वांच्या उत्साही प्रतिसादामुळे हे योग शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाले.

# घाटनांदूर अंगणवाडी क्र. 5 मध्ये मुदतबाह्य पोषण किट वाटपाचा धक्कादायक प्रकार

## प्रकरण दडपण्यासाठी सेविकेकडून पाकिटे जाळल्याचा आरोप; ग्रामस्थ संतप्त




घाटनांदूर, दि. 20 जून 2026 (महेंद्र गोदाम)


घाटनांदूर येथील अंगणवाडी क्रमांक 5 मध्ये चिमुकल्या बालकांना मुदतबाह्य पोषण आहाराचे किट वाटप करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार उघड झाल्यानंतर संबंधित अंगणवाडी सेविकेने उर्वरित मुदतबाह्य किटची पाकिटे जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी अंगणवाडीत आठ बालकांना 'मल्टी मिलेट न्यूट्रिशनल किट'चे वाटप करण्यात आले. घरी गेल्यानंतर एका पालकाने किटवरील मुदत तपासली असता त्यावर 'Expiry Date : 09 May 2026' अशी नोंद असल्याचे दिसून आले. म्हणजेच वाटपाच्या सुमारे 25 दिवसांपूर्वीच संबंधित किटची मुदत संपली होती. ही बाब लक्षात येताच संतप्त पालकांनी अंगणवाडी गाठून संबंधित सेविकेला जाब विचारला.

दरम्यान, पालकांचा विरोध वाढत असल्याचे पाहून अंगणवाडीतील शिल्लक असलेली सुमारे 15 किटची पाकिटे सेविकेने गोळा करून अंगणवाडीच्या पाठीमागे नेऊन जाळल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही जागरूक महिलांनी जळणाऱ्या पाकिटांचे मोबाईलमध्ये व्हिडिओ चित्रीकरण केल्याचेही सांगण्यात येत आहे.

या गंभीर प्रकाराबाबत अंबाजोगाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी, "प्रकरण माझ्या निदर्शनास आले आहे. संबंधित सुपरवायझरला तात्काळ बोलावून अहवाल मागविण्यात येईल. दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल," असे सांगितले. मात्र, थेट कारवाईचे ठोस आश्वासन न मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांनी या प्रकरणात संबंधित अंगणवाडी सेविका व पोषण किट पुरवठादाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. "हा आमच्या मुलांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर विषय आहे. मुदतबाह्य आहार वाटप करणे आणि त्यानंतर पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत गंभीर कृत्य असून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे," अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.




शासन कुपोषण निर्मूलनासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करीत असताना अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. आता या प्रकरणात प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

मिळाली. गीते यांच्या विजयामागे महायुतीतील मोठ्या प्रमाणावरील क्रॉस व्होटिंग कारणीभूत असल्याचा दावा राजकीय वर्तुळात केला जात आहे.

या निकालांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय निष्ठा, पक्षांतर्गत नाराजी आणि क्रॉस व्होटिंगचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा विषय ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

--------------------------------------------

आकडेवारी महाविकास आघाडीला मोठा धक्का देणारी ठरली. या मतदारसंघातील एकूण 988 पात्र मतदारांपैकी 983 लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला होता. मतमोजणी पूर्ण झाली तेव्हा भाजपचे बसवराज पाटील यांना तब्बल 844 मते पडल्याचे समोर आले. त्या तुलनेत काँग्रेसचे महेश देशमुख यांना केवळ 125 मते मिळवता आली, तर मतदारांची एकूण 14 मते बाद (अवैध) ठरली आहेत. या निवडणुकीत महायुतीकडे स्वतःचे अधिकृत संख्याबळ 624 मतदारांचे होते. मात्र, बसवराज पाटील यांना 844 मते मिळाल्याने अपक्ष मतदारांसह महाविकास आघाडीची अनेक मते फुटल्याचे (Cross Voting) आता अधिकृतपणे स्पष्ट झाले आहे.निवडणुकीची घोषणा झाल्यापासूनच या मतदारसंघात भाजपकडे स्पष्ट बहुमत होते. मात्र, लातूर, बीड आणि धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांतील अपक्ष आणि आघाडीतील नाराज लोकप्रतिनिधींची यशस्वी मोट बांधण्यात बसवराज पाटील आणि महायुतीच्या चाणक्यांना मोठे यश आले. या ऐतिहासिक विजयानंतर धाराशिव जिल्हा भाजप आणि महायुतीच्या गोटात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. विजय घोषित होताच शेकडो कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि मुख्य बाजारपेठेत फटाक्यांची जोरदार आतषबाजी केली, एकमेकांना पेढे भरवले आणि 'गुलाल' उधळून संपूर्ण शहर भगवेमय करुन सोडले. या निकालामुळे मराठवाड्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवरील महायुतीची पकड अधिक मजबूत झाली आहे.

--------------------------------------------

असून शिवसेनेची ताकद आणखी वाढल्याचे मानले जात आहे.

यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, "आज सहा खासदार शिवसेनेसोबत आले आहेत. लाखो मतदारांनी त्यांना निवडून दिले आहे. त्यांच्या मतदारसंघात आमचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक आणि जनतेची ताकद आता अधिक वाढली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी शिवसेना आणखी बळकट होईल. त्यांच्या मतदारसंघातील विकासकामे, प्रश्न आणि प्रकल्प प्रामाणिकपणे मार्गी लावण्याचे काम शिवसेना करेल, हा माझा शब्द आहे."

पुढे बोलताना शिंदे म्हणाले, "मी दिलेला शब्द पाळतो, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे कार्यकर्ता म्हणून लोक माझ्यावर विश्वास ठेवतात. मुख्यमंत्री असतानाही मी कार्यकर्ता म्हणूनच वागलो आणि आताही कार्यकर्ता म्हणूनच काम करत आहे. येथे कोणी मालक किंवा मोठा नेता नाही; आपण सर्व सहकारी आहोत. सर्वांनी कार्यकर्ता म्हणूनच काम करायचे आहे. तुमचा आणि तुमच्या कार्यकर्त्यांचा सन्मान राखला जाईल. आपण एक कुटुंब म्हणून पुढची वाटचाल करू."

खासदारांसाठी मोठी घोषणा करताना एकनाथ शिंदे म्हणाले, "आपण मंत्र्यांसोबत तुमची बैठक लावू, तुमचे प्रश्न सोडवू. केंद्राशी संबंधित प्रश्नही मार्गी लावले जातील. कुठेही कोणतीही अडचण येऊ देणार नाही. सर्वांनी मिळून शिवसेना अधिक मजबूत करायची, वाढवायची आणि घराघरात पोहोचवायची आहे. आपले सर्वांचे सहकार्य आणि ताकद एकत्र आल्यावर शिवसेना आणखी भक्कम होईल."या प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची राजकीय ताकद वाढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

--------------------------------------

बस्वराज पाटील यांच्यासह मराठवाड्यातील अमर राजूरकर, सईदखान, सुहास सिरसाठ तसेच नंदकिशोर महाजन, राजेंद्र राऊत, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, प्रवीण पोटे, धैर्यशील कदम या सर्व आमदारांचे ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करुन त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

----------------------------------------

परभणी यांची सुकन्या चि.सौ.कां.डॉ.जुही यांचा शुभविवाह सोहळा आज पुण्यात अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी उपस्थित राहून नवदांपत्याला भेटून त्यांच्या सुखी, समृद्ध आणि दीर्घायुषी वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व शुभाशीर्वाद दिले. तसेच या आनंदाच्या प्रसंगी वधू-वर कुटुंबीय, नातेवाईक व उपस्थित मान्यवरांशी आपुलकीचा संवाद साधला.

या मंगल प्रसंगी श्री. बाळदादा पवार, माजी आमदार श्री.लक्ष्मणराव पवार यांच्यासह पवार व यादव कुटुंबीय, गेवराईतील प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------------

रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या शिबिरामध्ये नागरिकांसाठी सीबीसी, एचबीए1, आणि लिक्विड प्रोफाईल यांसारख्या महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. एकूण 61 नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर 80 रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यावेळी उपस्थित वैद्यकीय तज्ज्ञांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून दिले. तसेच निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून त्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, याबाबतही जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महिला संघटना, युवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

समाजहिताच्या अशा उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य आणि सेवाभाव अधिक दृढ होत असून, परळी तालुक्यात या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

---------------------------------------

सांगितले की, ग्लोबल विकास ट्रस्टने आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ करण्याचे कार्य केले आहे. मात्र, आता केवळ व्यक्ती नव्हे तर संपूर्ण गाव समृद्ध करण्याच्या व्यापक उद्दिष्टाने "ग्लोबल गाव स्पर्धा" हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देत त्यांची स्वतंत्र आणि आदर्श अशी "ग्लोबल गाव" म्हणून ओळख निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या स्पर्धेत शेतकऱ्यांची गटात्मक बांधणी झालेल्या गावांना सहभागी होता येणार असून तंटामुक्ती, नशामुक्ती, हागणदारीमुक्ती, लोकसहभागातून जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या आधारे गुणांकन करण्यात येणार आहे. अंतिम निकालानंतर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आकर्षक प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. विशेष म्हणजे, बैठकीस उपस्थित असलेल्या गावांपैकी तब्बल 20 गावांनी "ग्लोबल गाव स्पर्धेत" सहभागी होण्याची तयारी दर्शवून ग्रामीण परिवर्तनाच्या चळवळीला भक्कम पाठिंबा दिला. यामुळे या उपक्रमाला प्रारंभापासूनच सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.

दरम्यान, गुरु पौर्णिमेच्या पावन पर्वावर राबविण्यात येणाऱ्या "25 लक्ष वृक्ष लागवड आणि संवर्धन महाअभियान" बाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाच्या या व्यापक लोकचळवळीत महिला आर्थिक विकास महामंडळ, बीड यांचा सक्रिय सहभाग राहणार असून बचत गटांच्या माध्यमातून सुमारे 150 गावांमध्ये महिला शक्ती प्रभावीपणे कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा समन्वयक विलास जगताप व उपस्थित सदस्यांनी हस्तनिर्मित पूजेचे आकर्षक ताट भेट देऊन जलनायक मयंक गांधी यांचा सन्मान केला. ग्रामीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि लोकसहभागाच्या नव्या संकल्पनांनी परिपूर्ण अशा या संवाद बैठकीत उत्साह, सकारात्मकता आणि परिवर्तनाची उमेद स्पष्टपणे जाणवत होती. गावांच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची नवी दिशा देणारा हा मेळावा ठरला.

---------------------------------------------

प्रथम कर्तव्य आहे. या प्रकरणातील आरोपींना पोलिस प्रशासनाने तात्काळ अटक करावी आणि त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. जिल्ह्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने केल्या पाहिजेत असे खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

------------------------------------------

मानली नाही. कठोर परिश्रम, नियमित सराव आणि जिद्दीच्या बळावर त्याने भारतीय सैन्याच्या अग्निवीर भरती प्रक्रियेत यश संपादन केले.

मुलाच्या निवडीची बातमी समजताच कष्टाने संसाराचा गाडा हाकणाऱ्या वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. साठेनगर परिसरात नागरिकांनी फटाक्यांची आतषबाजी करत मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. अनेकांनी तरुणाच्या घरी जाऊन त्याचा व कुटुंबीयांचा सत्कार करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

समाजाच्या तळागाळातील कुटुंबातून आलेल्या या तरुणाने केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण साठेनगर आणि परळी शहराचे नाव अभिमानाने उंचावले आहे. त्याच्या यशामुळे परिसरातील युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संघर्ष आणि जिद्दीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, असा संदेश त्याच्या यशोगाथेतून मिळत आहे.

"वडिलांच्या हलगीचा ताल आणि मुलाच्या देशसेवेचे स्वप्न... संघर्षाच्या मातीतून उगवलेला हा अग्निवीर आज हजारो तरुणांसाठी प्रेरणेचा दीप ठरला आहे," अशा भावना साठेनगरातील नागरिकांनी व्यक्त केल्या.

-----------------------------------------

भारतीय हवामान विभागाचा (IMD) नवा अंदाज समोर आला आहे. नव्या अंदाजानुसार पुढील 48 तासांमध्ये राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे.शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे, मराठवाड्यासह, कोकण किनार पट्टी, आणि पुण्यात मान्सून दाखल झाला आहे. पुढील 10 दिवस हे मान्सूनच्या वाटचालीसाठी अतिशय अनुकून असल्याचं हवामान विभागनं म्हटलं आहे. पुढील 48 तास हे मान्सूनसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, या काळात धाराशिव, पुणे, सोलापूर आणि कोकणातील काही भागांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. कोकणात मान्सून अडकला होता, परंतु तो आता पुण्यात दाखल झाला आहे, मराठवाड्यातील दक्षिण भागापर्यंत मान्सून पोहोचला आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागाचे हवामानशास्त्रज्ञ एसडी सानप यांनी दिली आहे.मात्र दुसरीकडे विदर्भात मान्सूनसाठी आणखी तीन ते चार दिवस वाट पहावी लागणार आहे. पुढील तीन ते चार दिवसांमध्ये मान्सून यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार विदर्भाच्या काही भागांमध्ये ढगाळ हवामान राहणार आहे, तर काही भागांमध्ये हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान सध्या जरी विदर्भात ढगाळ वातावरण राहणार असलं तरी देखील मान्सूनच्या पावसाठी प्रतीक्षाच करावी लागणार आहे. चार ते पाच दिवसांनंतर मात्र विदर्भात चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान आज नाशिक, नागपूर, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.

---------------------------------------------

## पान 4 वरुन

सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपींचा माग काढला. अखेर पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेत अटक केली.

या कारवाईमुळे गोतस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला असून पुढील तपास सुरु आहे. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांच्या धाडसी कारवाईचे कौतुक

मध्यरात्री जीव धोक्यात घालून केलेल्या या कारवाईमुळे वडवणी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. आरोपींनी पोलिसांवर वाहन घालूनही पथकाने धैर्याने पाठलाग करत गुन्हेगारांना जेरबंद केल्याने गोतस्करीचा मोठा डाव उधळण्यात यश आले आहे.

---------------------------------------

आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राचा संदर्भ घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

तातडीने अंमलबजावणीचे आदेशजिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना या बदलाची तात्काळ माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे पालक व शिक्षकांकडून स्वागत केले जात आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी दि. 17 जून 2026 रोजी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव मा. चंद्रकांत पुलकुंडकर (भा. प्र. से.) यांना पत्र देऊन मराठवाड्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शाळा तापमान कमी होईपर्यंत सकाळच्या पाळीत भरविण्याबाबत सूचना देण्याची मागणी केली होती.

-----------------------------------------

इच्छुक कलाकारांनी अधिक माहितीसाठी 8605038032 या क्रमांकावर संपर्क साधावा.

"तुमच्या अभिनयाला मिळेल नवी ओळख!" या घोषवाक्यासह ऑडिशनसाठी नोंदणी सुरु असून इच्छुकांनी आजच संपर्क साधावा, असे आवाहन Harsh Baba Entertainment तर्फे करण्यात आले आहे.

---------------------------------------

उपयोग करून ऊस शेतीमध्ये उत्पादनक्षमता वाढवण्याचा अभिनव प्रयोग यशस्वी केला आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत केळी लागवड करून त्यांनी शेतीला आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे. जलसंधारणासाठी सामूहिक शेततळ्यांची उभारणी करून पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केले असून, त्याच शेततळ्यांमध्ये मत्स्यपालन करून अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोतही निर्माण केला आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ घेत त्यांनी कृषी अवजारे बँक उभारली असून गट शेती योजनेतून क्लिनिंग व ग्रेडिंग युनिटची स्थापना केली आहे. तसेच स्मार्ट योजनेअंतर्गत गोदामाची उभारणी करून शासकीय खरेदी केंद्राची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा लाभहोत आहे.

---------------------------------------

नातेवाईकांचा आरोप आहे की, साठेनगर भागात गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम हातभट्टी दारूची विक्री सुरु असून याबाबत वारंवार तक्रारी, निवेदने आणि मोर्चे काढूनही पोलिसांनी प्रभावी कारवाई केली नाही.घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडत, "परळीत संपूर्ण दारूबंदी करा, अन्यथा मृतदेह पोलीस ठाण्यात आणून ठेवू", असा इशारा दिला. यावेळी महिलांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, साठेनगर परिसरातील हातभट्टी दारू विक्रीबाबत अनेकदा पोलीस प्रशासनाला माहिती देण्यात आली होती. मात्र संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात आली नसल्याने हा दुर्दैवी प्रकार घडला. त्यामुळे या मृत्यूस जबाबदार असलेल्या दारू विक्रेत्यांवर तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

पुणे विषारी दारू प्रकरणात ज्या पद्धतीने दारू विक्रेत्यांवर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात आले, त्याच धर्तीवर परळीतील या प्रकरणातही संबंधित दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नातेवाईक व नागरिकांनी केली आहे.दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण वैद्यकीय तपासणी व अधिकृत अहवालानंतर स्पष्ट होणार असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. या घटनेमुळे परळी शहरात खळबळ उडाली असून अवैध हातभट्टी दारुविरोधात कठोर कारवाईची मागणी जोर धरु लागली आहे.

---------------------------------------

शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला.मार्गदर्शन करताना सौ. दीपाताई मुधोळ-मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांसाठी शासन विविध कल्याणकारी योजना राबवत असून त्यांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. "शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रसारमाध्यमांनी करावे," असे आवाहन त्यांनी केले.यावेळी नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी आपल्या मनोगतात लोकशाहीतील प्रसारमाध्यमांचे महत्त्व अधोरेखित केले. "वर्तमानपत्रे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून प्रसारमाध्यमे कार्य करतात," असे त्या म्हणाल्या.निष्पक्ष, वस्तुनिष्ठ आणि समाजहिताच्या दृष्टिकोनातून पत्रकारिता केली गेल्यास लोकशाही अधिक सक्षम आणि बळकट होते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ नेते भास्कर चाटे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत मुंडे सर व बंडू आघाव सर यांनी केले.या कार्यक्रमास पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संपादक बालकिशन सोनी व न्याय टाइम्स परिवाराने विशेष परिश्रम घेतले.दैनिक न्याय टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त झालेला हा सोहळा सामाजिक बांधिलकी, पत्रकारितेचे महत्त्व आणि शासनाच्या जनकल्याणकारी योजनांच्या प्रसाराचा संदेश देणारा ठरला.

---------------------------------------

वातावरण निर्माण झाले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वाढती महागाई, घरगुती खर्च आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना वाढीव कर भरणे कठीण होत आहे. त्यामुळे मालमत्ता कर आकारणीचे पुनर्मूल्यांकन करून न्याय्य दर निश्चित करावेत तसेच करात सवलत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे तालुका अध्यक्ष शंकर नामदेव झाडे यांनी सांगितले की, "मालमत्ता कर आकारणी करताना नागरिकांची आर्थिक परिस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. करामध्ये योग्य सवलत मिळाल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल."

दरम्यान, नगराध्यक्ष शेषराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे आणि मुख्याधिकारी यांनी निवेदन स्वीकारून या मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिले.

या प्रसंगी नगरपंचायतीचे सभापती तथा नगरसेवक नागेशभाऊ डिगे, ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे तालुका अध्यक्ष शंकर झाडे, सहसंघटक नारायण जाधव, अशोक जगताप तसेच शहरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

मालमत्ता कर कपातीच्या मागणीमुळे वडवणी शहरात या विषयावर जोरदार चर्चा सुरु झाली असून नगरपंचायत प्रशासन याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वडवणी नगरपंचायतीकडून वितरित करण्यात आलेल्या मालमत्ता कर नोटिसांमध्ये अनेक करधारकांच्या वार्ड क्रमांक, मालमत्ता क्रमांक तसेच सर्व्हे व गट क्रमांकामध्ये त्रुटी असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे करवाढीचा आर्थिक भार सहन करत असतानाच नागरिकांना नोंदी दुरुस्तीसाठी वारंवार नगरपंचायतीचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

हरकत नोंदविण्यासाठी करधारकांना मालकी हक्काची कागदपत्रे, जुन्या कर पावत्या, सातबारा उतारे आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत असून त्यासाठी वेळ आणि अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

"करवाढीसोबतच चुकीच्या नोंदी करून नगरपंचायत कर वसुलीसाठी नागरिकांवर दबावाचे धोरण अवलंबत आहे काय?" असा सवाल अनेक करधारकांकडून उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून त्रुटी तातडीने दुरुस्त कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

---------------------------------------------

विविध योगासने सादर करण्यात आली. योगासनांची सांगता शाळेतील शिक्षक श्री. रोकडे एस.व्ही.यांनी हास्य योगासनाद्वारे केली. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सर्वांच्या सहभागामुळे जागतिक योग दिनाचा कार्यक्रम उत्साहात व यशस्वी रित्या पार पडला.

--------------------------------------------

युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी व्यवसायाला शुभेच्छा देत ग्राहकांना स्वच्छ, दर्जेदार व चविष्ट खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले.

मुंबईच्या खास चवीचा अनुभव आता वडवणीकरांना स्थानिक पातळीवर मिळणार असल्याने नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. उद्घाटनानंतर उपस्थितांनी विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत नव्या व्यवसायाला भरभराटीच्या शुभेच्छा दिल्या.

"मुंबईची चव आता वडवणीत" या संकल्पनेतून सुरु झालेल्या मुंबई स्पेशल हटके वडा या उपक्रमाने दमदार सुरुवात केली असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

--------------------------------------------

या पार्श्वभूमीवर रिक्षाचालकांनी रस्त्याच्या मध्यभागी अथवा वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी वाहने उभी करू नयेत, हातगाडी चालकांनी व्यवसाय करताना रस्त्याचा वापर करणाऱ्या नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानासमोर रस्त्यावर अतिक्रमण करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय दुचाकी व चारचाकी वाहनधारकांनी वाहने निर्धारित ठिकाणीच पार्क करावीत, हेल्मेटचा वापर करावा, वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत आणि शहरातील शिस्तबद्ध वाहतुकीसाठी पोलिसांना सहकार्य करावे, असेही एपीआय नेरकर यांनी म्हटले आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करून सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तींविरोधात नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

---------------------------------------------

अवस्थेत त्यांना प्रथम माजलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, जखमी उफाडे जीवन-मृत्यूशी झुंज देत असताना त्यांच्या जबाबासाठी दोन दिवस कोणताही पोलीस अधिकारी अथवा कर्मचारी जिल्हा रुग्णालयात पोहोचला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ही बाब सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मातंग समाजाच्या पदाधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर समाजाच्या प्रमुखांनी थेट माजलगाव पोलीस निरीक्षकांशी संपर्क साधून प्रशासनाच्या दिरंगाईबाबत नाराजी व्यक्त केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने बीड जिल्हा रुग्णालय गाठून राधाकिसन उफाडे यांचा जबाब नोंदविला. यावेळी सुनील शिंदे, उफाडे यांचे दोन्ही पुत्र, पवन शिंदे तसेच समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

मातंग समाजाचे पदाधिकारी विनोद दादा हातागळे यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करताना सांगितले की, "मातंग समाजातील एका वृद्ध नागरिकावर झालेला हा हल्ला अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह आहे. दोन दिवस पोलिसांनी दखल घेतली नाही. समाजाच्या हस्तक्षेपानंतरच जबाब नोंदविण्यात आला. या प्रकरणातील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली नाही तर मातंग समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."

या घटनेमुळे माजलगाव शहर व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून गेल्या काही महिन्यांत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे. वाढत्या गुन्हेगारीला वेळीच आळा घालण्यासाठी शहर व ग्रामीण पोलिसांनी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, या प्रकरणात पोलीस कोणती कारवाई करतात आणि आरोपींना कधी अटक होते, याकडे संपूर्ण माजलगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

---------------------------------------

पाण्याबरोबरच जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत आहे. राज्यभरात पावसाच्या विलंबामुळे जलसंकटाची स्थिती निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, प्रशासनाने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज व्यक्त होत असून, पाणीपुरवठ्यासाठी टँकर उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

------------------------------------------

परिसरातील सर्व शेतकरी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी पुत्र आणि जिल्हा परिषद सदस्य अविनाश अशोकराव मोरे यांनी संघर्षनेता चा.प्रतिनिधीशी बोलताना सांगितले

------------------------------------

## देवस्थान इनाम जमीन कायद्यावर हरकतीचा पाऊस, एकट्या पुणे विभागातून 16 हजार हरकती




मुंबई: राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचे संवर्धन करण्यासह वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले समस्या मार्गी लावण्यासाठी सर्वंकष कायदा तयार करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या आहेत.

सोमवारी मंत्रालयात 'देवस्थान इनाम जमीन धोरण प्रारूप समिती'ची पहिली बैठक पार पडली. यावेळी कायद्याचा कृती आराखडा निश्चित करण्यासाठी टप्पे ठरविण्यात आले. हा नवा कायदा करताना उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच इतर जुन्या कायद्यांचा सखोल अभ्यास केला जावा आणि भविष्यात कोणतीही नवीन कायदेशीर गुंतागुंत किंवा सर्वसामान्यांच्या अडचणी वाढणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

समितीचे सचिव कैलास गायकवाड यांनी मागील प्रारूपावर राज्यभरातून आलेल्या हरकती व सूचनांची माहिती दिली. पुणे विभागातून 16 हजार, नाशिक साडेपाच हजार, कोकण 1350, नागपूर 225 तर अमरावती विभागातून 50 सूचना व हरकती आल्या आहेत. महसूल विभागाचे अप्पर मुख्य व समितीचे अध्यक्ष सचिव खारगे यांनी समितीच्या कामकाजाची दिशा स्पष्ट केली. ते म्हणाले, या प्रक्रियेत प्रत्येक कामाची आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, तसेच इतर राज्यांतील वेगवेगळ्या कायद्यांचा आणि सध्याच्या कायदेशीर बाबींचा सखोल अभ्यास करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल. घाईगडबड न करता एकाच वेळी सर्व विषयांना हात न घालता, एक-एक विषय घेऊन त्यावर सविस्तर चर्चा केली जाईल, ज्यामध्ये गावठाणांसह इतर सर्व घटकांचा समावेश असेल.बैठकीत, देवस्थान समितीच्या सदस्यांनी कामकाज आणि कृती गट तयार करण्याबाबत विशेष सादरीकरण करून आपली मते मांडली. त्यानुसार हा कायदा अधिक परिपूर्ण करण्यासाठी आणि प्रत्यक्ष जमिनीवरील अडचणी समजून घेण्यासाठी ऐतिहासिक व विधिमंडळ अभ्यास गट, मालमत्ता व कायदेशीर अभ्यास गट आणि विभागीय सल्लामसलत गट अशा तीन विशेष कृती गटांची स्थापना करण्यात आली आहे.महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी जुनी गावठाणे, वाड्या आणि पाडे थेट देवस्थानच्या जागांवर वसलेली असून पिढ्यानपिढ्या तिथे राहणाऱ्या या नागरिकांबाबत आणि गावांबाबत समितीने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना कायदेशीर संरक्षण द्यावे.'कोकण आणि पुणे विभागाचे विभागीय आयुक्त, अहिल्यानगर आणि ठाण्याचे जिल्हाधिकारी यांच्यासह देवस्थान समित्यांचे सुनील घनवट, अनुप जयस्वाल, संदीप महाजन, आशिष सोनवणे, जगदीश पाटील, अनिल सांबरे, रविंद्र क्षीरसागर, राजेश मुधोळकर, संजीव देशपांडे हे अशासकीय सदस्य उपस्थित होते.

# मध्यरात्री सिनेस्टाईल पाठलाग; वडवणी पोलिसांनी उधळला गोतस्करीचा मोठा डाव, तीन आरोपी जेरबंद!




वडवणी | प्रतिनिधी वडवणी शहरात राबविण्यात येत असलेल्या 'ऑल आऊट ऑपरेशन' अंतर्गत पोलिसांनी मध्यरात्री सिनेस्टाईल पाठलाग करून गोतस्करीचा मोठा डाव उधळून लावला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तीन आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मध्यरात्रीचा थरार; पोलिसांना कट मारून पसार होण्याचा प्रयत्न

दिनांक 14 जून 2026 रोजी रात्री 11 वाजल्यापासून ते 15 जूनच्या पहाटे 5 वाजेपर्यंत वडवणी शहरात नाकाबंदी सुरु होती. पहाटे सुमारे 1.30 वाजण्याच्या सुमारास पोलिसांना MH-04 CD-9835 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली.

पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिला असता चालकाने गाडीचा वेग वाढवत पोलिसांना कट मारला आणि बीडकडे भरधाव वेगाने पळ काढला. यानंतर काही काळ परिसरात थरारक पाठलाग सुरु झाला.

पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न

घटनेची माहिती मिळताच सपोनि वर्षा व्हागडे यांनी पुढील नाकाबंदी पथकांना सतर्क केले. जगताप पेट्रोल पंपाजवळील पुलाच्या परिसरात पोलिसांनी पुन्हा वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने थेट पोलीस अंमलदारांच्या अंगावर वाहन घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला.

पोलिसांनी प्रसंगावधान राखत बाजूला उडी मारल्याने मोठी दुर्घटना टळली. आरोपींनी मात्र भरधाव वेगाने पळ काढला.

गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी जेरबंद

घटनेनंतर वडवणी पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत गोपनीय माहिती, पान 3 वर

## बीड जिल्ह्यातील शाळा आता सकाळच्या सत्रात भरणार

### » वाढत्या तापमानामुळे जिल्हा परिषदेचा मोठा निर्णय

बीड, दि. 22 (प्रतिनिधी): राज्यात सध्या वाढलेल्या तापमानाचा आणि उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन बीड जिल्हा परिषदेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मंगळवार, दि. 23 जून 2026 पासून पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात येणार आहेत. याबाबतचे अधिकृत परिपत्रक जिल्हा परिषद प्रशासनाने सोमवारी जारी केले.

'अल निनो'च्या प्रभावामुळे तसेच पावसाच्या लांबलेल्या प्रतीक्षेमुळे जिल्ह्यात तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या



आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिक्षण विभागाने हा निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली आहे. नवीन आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा सकाळी 8.00 ते दुपारी 12.30 या वेळेत चालविण्यात येणार आहेत.

तीव्र उष्णतेमुळे विद्यार्थ्यांना उष्माघात, निर्जलीकरण तसेच उष्णतेशी संबंधित इतर आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. या संभाव्य धोक्याचा विचार करून विविध शिक्षक संघटनांच्या मागण्या पान 3 वर

## मराठी शॉर्ट फिल्म "जिवंत नरक" साठी कलाकारांची निवड प्रक्रिया सुरू

वडवणी | प्रतिनिधी

हर्ष बाबा इंटरटेनमेंट निर्मित आगामी मराठी शॉर्ट फिल्म "जिवंत नरक" साठी कलाकारांची निवड प्रक्रिया (ऑडिशन) सुरु करण्यात आली आहे. सामाजिक विषयावर आधारित असलेल्या या सोशल थ्रिलर चित्रपटासाठी नवोदित तसेच अनुभवी कलाकारांना संधी देण्यात येणार आहे.

निर्मात्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चित्रपटासाठी 18 ते 35 वर्षे वयोगटातील मुलगे, 18 ते 30 वर्षे वयोगटातील मुली, 40 ते 65 वर्षे वयोगटातील काका/अंकल तसेच 35 ते 60 वर्षे वयोगटातील काकू/आंटी पात्रांची आवश्यकता आहे.

अभिनयाची आवड असलेल्या इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. चित्रपटाचे शूटिंग वडवणी (जि. बीड) येथे होणार असून हा चित्रपट सामाजिक वास्तवावर आधारित थरारक कथानक घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

पान 3 वर

## आधुनिक तंत्रज्ञानाने मंगल काकडेंना कृषिभूषण पुरस्कार जाहीर !



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे केज तालुक्यातील बनसारोळा येथील प्रगतशील महिला शेतकरी मंगल बाळासाहेब काकडे यांना शेती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत जिजामाता कृषिभूषण पुरस्कार 2023 जाहीर झाला आहे. त्यांच्या या यशामुळे केज तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्याच्या कृषी क्षेत्राचा गौरव वाढला आहे. बनसारोळा येथील मंगल काकडे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड पारंपरिक शेतीशी घालत शेतीमध्ये उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि शाश्वत कृषी विकासाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी आपल्या शेतामध्ये सूक्ष्म सिंचनाचा प्रभावी वापर करून पाण्याचा काटेकोर व कार्यक्षम वापर केला आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित तंत्रज्ञानाचा पान 3 वर

# पुणे दुर्घटनेची पुनरावृत्ती परळीत? विषारी हातभट्टी दारू प्रकरणी युवकाचा मृत्यू

### संतप्त नागरिकांचा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या



परळी वैजनाथ | प्रतिनिधी परळी शहरातील साठेनगर परिसरात विषारी हातभट्टी दारु पिल्याने एका युवकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांनी परळी शहर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करत संबंधित दारु विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर, नगरसेवक नितीन रोडे, रतन आदोडे,भैय्यासाहेब आदोडे, बालाजी मस्के,नवनाथ मस्के, नागनाथ मस्के, दीपक लोंढे, ऋषिकेश क्षीरसागर, आनंद कांबळे, दर्शन लोंढे, बाळू मस्के, संजय कुमार शिंदे, बाबुराव मस्के, सोमनाथ मस्के व सर्व महिलाकेली आहे.

पुण्यात नुकत्याच घडलेल्या विषारी हातभट्टी दारु प्रकरणात अनेकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच परळीतही अशाच प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. मृत युवकाच्या पान 3 वर

## शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रसारमाध्यमांनी करावे – दीपाताई मुधोळ-मुंडे

### » शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून प्रसारमाध्यमे कार्य करतात – पद्मश्रीताई धर्माधिकारी



परळी वैजनाथ | प्रतिनिधी परळी वैजनाथ येथे दैनिक न्याय टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास सामाजिक न्याय विभागाच्या पुणे समाजकल्याण आयुक्त सौ. दीपाताई मुधोळ-मुंडे (IAS) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, ज्येष्ठ नेते भास्कर चाटे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, काँग्रेस नेते वसंत मुंडे, तसेच दैनिक न्याय टाइम्सचे संपादक बालकिशन सोनी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संपादक बालकिशन सोनी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. तसेच पान 3 वर

## मालमत्ता कर कपातीसाठी ग्राहक पंचायतचा एल्गार; नगराध्यक्षांना निवेदन

### » वाढीव कर आकारणी व चुकीच्या नोंदींमुळे नागरिक त्रस्त; नगरपंचायतीने सकारात्मक विचार करण्याचे दिले आश्वासन



वडवणी | प्रतिनिधी वडवणी शहरातील वाढीव मालमत्ता कराच्या विरोधात ग्राहक पंचायत महाराष्ट्र, वडवणी तालुक्याच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाविरोधात एल्गार पुकारण्यात आला असून मालमत्ता करात कपात करण्याच्या मागणीसाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

ग्राहक पंचायतच्या शिष्टमंडळाने नगराध्यक्ष शेषराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे आणि मुख्याधिकारी यांची भेट घेऊन शहरातील नागरिकांवर वाढीव मालमत्ता करामुळे पडणारा आर्थिक भार कमी करण्याची मागणी केली. नगरपंचायतीकडून चार वर्षांच्या मालमत्ता कर आकारणीच्या नोटिसा वितरित करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे पान 3 वर

## बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा !



केज प्रतिनिधी /रोहन गलांडे केज तालुक्यातील बनसारोळा येथे दि.21 जून रोजी रविवारी आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,बनसारोळा येथे जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी 7 ते 7-45 या वेळेत आयोजित कार्यक्रमात योगासने व प्राणायामाचा सराव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बालासाहेब काकडे हे उपस्थित होते.योग दिना निमित्त पवार सर यांनी योगाचे महत्त्व,त्याचे आरोग्यदायी फायदे तसेच नियमित योगाभ्यासाची आवश्यकता याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.योग प्रात्यक्षिका साठी कापसे सर आणि लोखंडे सर यांनी मार्गदर्शक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.कार्यक्रमात पान 3 वर

# वडवणीत 'मुंबई स्पेशल हटके वडा'चे जोरदार उद्घाटन संपन्न



वडवणी | प्रतिनिधी वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि. 22-06-2026 नव्याने सुरु झालेल्या 'मुंबई स्पेशल हटके वडा' या खाद्य व्यवसायाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात सकाळी 11:00 वाजता संपन्न झाले.

या उद्घाटन सोहळ्यास भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, तसेच भाजपाचे जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, बाबुराव पांचाळ, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत फीत कापून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शहरातील व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पान 3 वर

## वाहतूक शिस्त राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे : एपीआय कल्याण नेहरकर यांचे आवाहन



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) : माजलगाव शहरातील वाढती वाहतूक आणि त्यातून निर्माण होणारी कोंडी लक्षात घेता शहरवासीय, व्यापारी, हातगाडी चालक, रिक्षाचालक तसेच सर्व वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) कल्याण नेहरकर यांनी केले आहे.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ, शाळा परिसर, बसस्थानक परिसर आणि प्रमुख चौकांमध्ये अनेकदा वाहने, रिक्षा व हातगाड्या अनियमितपणे उभ्या केल्या जात असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. परिणामी नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोका देखील वाढत आहे. पान 3 वर

## 72 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला अमानुष मारहाण; दोन दिवसांनंतर नोंदवला जबाब

### मातंग समाजाकडून तीव्र संताप, दोषींवर कठोर कारवाईची मागणी



माजलगाव, प्रतिनिधी : माजलगाव तालुक्यातील नागडगाव येथील 72 वर्षीय ज्येष्ठ नागरिक राधाकिसन उफाडे यांना जुन्या वादातून पैशाचा खोटा आरोप करून जबरदस्तीने रिक्षामध्ये टाकून नेऊन अमानुष मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या उफाडे यांच्यावर सध्या बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन ते तीन दिवसांपूर्वी काही समाजकंटकांनी जुन्या वादातून राधाकिसन उफाडे यांच्यावर पैशाचा खोटा आरोप केला. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने रिक्षात बसवून अज्ञातस्थळी नेण्यात आले व बेदम मारहाण करण्यात आली. गंभीर जखमी पान 3 वर

## आष्टीत विविध गावांतून पाणी टँकरची मागणी वाढली : जून महिना अर्धा लोटला तरी पाऊस न झाल्याने परिस्थिती बिकट



आष्टी | प्रतिनिधी जून महिना अर्धा संपला तरीही तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झाला नसल्याने आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. परिणामी विविध गावांतून पाणी टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. पिण्याच्या पाण्याचे स्रोत आटू लागल्याने ग्रामस्थांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनासमोरही मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

तालुक्यातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीपुरवठा योजना कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. महिलांना आणि नागरिकांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. काही गावांमध्ये पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी करण्यात आली आहे.

मान्सूनने पाठ फिरवल्याने शेतीची कामेही ठप्प झाली असून खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पाऊस लांबल्याने पिण्याच्या पान 3 वर

## तीन महिन्यापासून निराधारांचा पगार रखडले, शरदचंद्र पवार पक्षाचे सर्कल प्रमुख हनुमंत राजे मोरे



बर्दापूर प्रतिनिधी, ज्या व्यक्तींना स्वतःचा संभाळ करणे शक्य नसतो आणि ज्या कुटुंबाचा कोणीही आधार नसतो वृद्ध अनाथ मुले निराधार महिला किंवा दिव्यांग व्यक्ती अशा व्यक्तींना शासनाच्या संजय गांधी निराधार इंदिरा गांधी योजनेतील निराधार अपंग लोकांना दर महिना दीड हजार रुपयांचे मानधन दिले जात असते परंतु योजनेतील निराधारांचा पगार गेल्या तीन महिन्यापासून रखडलेला असल्याचे निराधार यांचा उपासमारीची वेळ आली आहे बहुतेक निराधार लाभार्थी हे मिळणाऱ्या तटपुंजी पगारातून आपला आजारातील औषध गोळ्यावर अवलंबून आहेत ऑनलाईन हातय प्रमाणपत्र दाखल करण्याच्या नावाखाली तीन महिन्यापासून निराधारची पगार रखडले आहेत तात्काळ निराधारची पगार खात्यात जमा करा यांनी तहसील कार्यालयात केले आहे असे आवाहन शरदचंद्र पवार पक्षाचे सर्कल प्रमुख हनुमंत राजे मोरे यांनी केले आहे

## खत दरवाढ, विमा प्रश्न रस्ता रोको आंदोलन, सर्व शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे

### असे आवाहन जि,प, सदस्य, अविनाश मोरे



बर्दापूर प्रतिनिधी,,,,रोफ आत्तार अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील खरीप हंगामाचा पिक विमा तातडीने मंजूर करावा खत दरवाढ कमी करावी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द कराव्या या मागण्यासाठी मंगळवारी, दिनांक 23 सकाळी ठीक दहा वाजता आंदोलन करण्यात येणार आहे अंबाजोगाई लातूर महामार्ग जिल्हा परिषद सदस्य अविनाश अशोकराव मोरे आणि यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होईल वाढत उत्पादन खर्च आणि कर्जमुक्तीच्या अटीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन छेडले जात आहे या आंदोलन पान 3 वर